क्र.२/नसवि/महासभा/ १० /२०११-२०१२
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १२ जानेवारी २०१२

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - १० /२०११-२०१२

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक २०/०१/२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि. २०/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवठ्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या मिरज शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे सन २००३ मध्ये लहान मुलांना खेळण्यासाठी मिनी गार्डन ट्रेन बसविली होती व प्रति मुलास रु.१/- मात्र तिकीट आकारुण काही दिवस गार्डन ट्रेन सुरु होती. परंतु उद्यानास बंदिस्त कंपौंड नसल्याने व अपुऱ्या कर्मचारी अभावी तसेच सुरक्षा रक्षक नसल्याने गार्डन ट्रेनचे स्पेअर पार्ट चोरीस गेले आहेत. त्याबाबत पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली आहे. स्पेअर पार्ट चोरीस गेल्या पासून गार्डन ट्रेन बंद आहे. गार्डन ट्रेन बसविलेल्या अरिहंत इंडस्ट्रीयल कार्पोरेशन लि.कंपनीकडून ट्रेन दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत माहे डिसेंबर २००४ मध्ये एस्टीमेट मागविले होते. सदर कंपनीने ट्रेन दुरुस्तीसाठी रु.२,९५,०००/- मात्रचे एस्टीमेट दिले होते. त्यानुसार ट्रेन दुरुस्ती करुन खाजगी तत्वावर चालविणेस देणेचा प्रस्ताव होता. परंतु याकामी एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यावर मा.महासभा ठराव क्र.११० दि.१८/१०/२००७ ने प्राप्त झालेली एकच निविदा उघडून गार्डन ट्रेन सुरु करणेबाबत निर्णय झाला होता. परंतु गार्डनला बंदिस्त कंपौंड नसल्याने व उद्यानाभोवती झोपडपट्टी असल्याने, ट्रेन सुरु करता आली नाही. दरम्यान मुख्तार महंमद खान यांनी दि.१०/०६/२०११ व दि.१४/०७/२०११ चे पत्राने आंबेडकर उद्यानातील बंद असलेल्या ट्रेनचे जुने डबे उपयोगात आणून स्वखर्चाने दुरुस्ती करुन प्रति मुलास रु.३/- तिकीट फी आकारुण ५ वर्षे मुदतीने ट्रेन सुरु करणेची तयारी दर्शविली आहे. त्याच प्रमाणे दोन खेळणी मोफत बसविणेची तयारी दर्शविली आहे. त्यानुसार श्री.मुख्तार महंमद खान यांना महापालिकेच्या शर्ती-अटीस अधिन राहून गार्डन ट्रेन सुरु करणेस परवानगी देणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/१२/२०११ चे विषयपत्र.**

... २ ...

५. महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून पाणी बिलाचा थकबाकी १००% वसुली होणेकरीता सन २००८-२०११ पर्यंत दरवर्षी मा.महापौर उपभोक्ता योजना प्रस्तावित केली जात होती. सदर योजनेंतर्गत फक्त मुळ पाणी बिल वसुल करणेत येवून, थकबाकीवर विलंब शुल्क माफ करणेत येत आहे. त्यामुळे सन २००८-०९ ते २०१०-११ अखेर पाणी बिलापोटी रु.६,६९,४८,६७८/- वसुल करणेत आली आहे व मा.महापौर योजनेंतर्गत १००% विलंब शुल्क माफी करणेत आली होती. या अंतर्गत रु.२,७८,२३,७३२/- इतकी सवलत देणेत आली आहे. सन २०१०-२०११ मध्ये मा.महापौर सवलत योजना हा ठराव क्र.१८५ दि.२०/१२/२०१० निदर्शनास आणला असता सदर योजनेमुळे नियमित पाणी बिल भरणारे ग्राहकांचेवर अन्याय होत असून, याबाबत तक्रारी येत आहेत. तसेच, नियमित पाणी बिल भरणाऱ्या ग्राहकांची थकबाकी ठेवणेबाबत मानसिकता वाढत आहे. म्हणून पुढील तीन वर्षे ही योजना लागू करु नये यास मान्यता दिली होती. तथापि, सन २०११-१२ साठी मा.महासभा ठराव क्र.१७२ दि.२९/११/२०११ अन्वये उपरोक्त योजना लागू करणेस मान्यता दिली आहे. सदरचा ठराव मा.आयुक्तसो यांचे निदर्शनास आणले असता त्यांनी प्रस्तावित माफी योजनेमुळे मनपाचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे असे आदेश केले आहेत. या योजनेस ग्राहकाकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, सदर योजनेचा कालावधी ३१ मार्च २०११ संपल्यानंतर सुद्धा ग्राहकांनी येवून या योजनेची मुदतवाढ करणेबाबत मागणी करीत आहेत. तरी उपरोक्त मा.महापौर उपभोक्ता सवलत योजना सन २०११-१२ मध्ये राबविणेबाबत फेर विचारार्थ व निर्णयार्थ **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१२/०१/२०१२ चे विषयपत्र.**

६. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

७. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

२४/१/१२

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :-२०/०१/२०१२

ठराव क्रमांक :- 203

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.२०/१२/२०११ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१७३ ते ठराव क्र.२०२ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- Keerron

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

कार्यालय अधीक्षक (मा.स)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :- २०/०१/२०१२

ठराव क्रमांक :- २०४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

महापालिकेच्या वॉर्ड क्र. ४६ च्या नगरसेविका सौ.संगिता विठ्ठल खोत यांना कोल्हापूर येथील आदर्श फौंडेशनच्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आदर्श महिला पुरस्काराने सन्मानित करणेत आले. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा सौ.संगिता विठ्ठल खोत यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.युवराज बावडेकर

अनुमोदक :- मा.संतोष देवळेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :-२०/०१/२०१२

ठराव क्रमांक :- 204

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/१२/२०११ चे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिकेच्या मिरज शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे सन २००३ मध्ये लहान मुलांना खेळण्यासाठी मिनी गार्डन ट्रेन बसविली होती व प्रति मुलास रु.१/- मात्र तिकीट आकारुण काही दिवस गार्डन ट्रेन सुरु होती. परंतु उद्यानास बंदिस्त कंपौंड नसल्याने व अपुऱ्या कर्मचारी अभावी तसेच सुरक्षा रक्षक नसल्याने गार्डन ट्रेनचे स्पेअर पार्ट चोरीस गेले आहेत. त्याबाबत पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली आहे. स्पेअर पार्ट चोरीस गेल्या पासून गार्डन ट्रेन बंद आहे. गार्डन ट्रेन बसविलेल्या अरिहंत इंडस्ट्रीयल कार्पोरेशन लि.कंपनीकडून ट्रेन दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत माहे डिसेंबर २००४ मध्ये एस्टीमेट मागविले होते. सदर कंपनीने ट्रेन दुरुस्तीसाठी रु.२,९५,०००/- मात्रचे एस्टीमेट दिले होते. त्यानुसार ट्रेन दुरुस्ती करुन खाजगी तत्वावर चालविणेस देणेचा प्रस्ताव होता. परंतु याकामी एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यावर मा.महासभा ठराव क्र.११० दि.१८/१०/२००७ ने प्राप्त झालेली एकच निविदा उघडून गार्डन ट्रेन सुरु करणेबाबत निर्णय झाला होता. परंतु गार्डनला बंदिस्त कंपौंड नसल्याने व उद्यानाभोवती झोपडपट्टी असल्याने, ट्रेन सुरु करता आली नाही. दरम्यान मुख्तार महंमद खान यांनी दि.१०/०६/२०११ व दि.१४/०७/२०११ चे पत्राने आंबेडकर उद्यानातील बंद असलेल्या ट्रेनचे जुने डबे उपयोगात आणून स्वखर्चाने दुरुस्ती करुन प्रति मुलास रु.३/- तिकीट फी आकारुण ५ वर्षे मुदतीने ट्रेन सुरु करणेची तयारी दर्शविली आहे. त्याच प्रमाणे दोन खेळणी मोफत बसविणेची तयारी दर्शविली आहे. त्यानुसार श्री.मुख्तार महंमद खान यांना महापालिकेच्या शर्ती-अटीस अधिन राहून गार्डन ट्रेन सुरु करणेस परवानगी देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

सहा.आयुक्त

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :-२०/०१/२०१२

ठराव क्रमांक :- २०६

विषय क्रमांक :- ०५

१०

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१२/०१/२०१२ चे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून पाणी बिलाचा थकबाकी १००% वसुली होणेकरीता सन २००८-२०११ पर्यत दरवर्षी मा.महापौर उपभोक्ता योजना प्रस्तावित केली जात होती. सदर योजनेंतर्गत फक्त मुळ पाणी बिल वसुल करणेत येवून, थकबाकीवर विलंब शुल्क माफ करणेत येत आहे. त्यामुळे सन २००८-०९ ते २०१०-११ अखेर पाणी बिलापोटी रु.६,६९,४८,६७८/- वसुल करणेत आली आहे व मा.महापौर योजनेंतर्गत १००% विलंब शुल्क माफी करणेत आली होती. या अंतर्गत रु.२,७८,२३,७३२/- इतकी सवलत देणेत आली आहे. सन २०१०-२०११ मध्ये मा.महापौर सवलत योजना हा ठराव क्र.१८५ दि.२०/१२/२०१० निदर्शनास आणला असता सदर योजनेमुळे नियमित पाणी बिल भरणारे ग्राहकांचेवर अन्याय होत असून, याबाबत तक्रारी येत आहेत. तसेच, नियमित पाणी बिल भरणाऱ्या ग्राहकांची थकबाकी ठेवणेबाबत मानसिकता वाढत आहे. म्हणून पुढील तीन वर्षे ही योजना लागू करु नये यास मान्यता दिली होती. तथापि, सन २०११-१२ साठी मा.महासभा ठराव क्र.१७२ दि.१९/११/२०११ अन्वये उपरोक्त योजना लागू करणेस मान्यता दिली आहे. सदरचा ठराव मा.आयुक्तसाो यांचे निदर्शनास आणले असता त्यांनी प्रस्तावित माफी योजनेमुळे मनपाचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे असे आदेश केले आहेत. या योजनेस ग्राहकाकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, सदर योजनेचा कालावधी ३१ मार्च २०११ संपल्यानंतर सुद्धा ग्राहकांनी येवून या योजनेची मुदतवाढ करणेबाबत मागणी करीत आहेत. तरी उपरोक्त मा.महापौर उपभोक्ता सवलत योजना सन २०११-१२ मध्ये राबविणेबाबतचा विषय महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.६९ ची पोटनिवडणुक आचारसंहिता असल्याने, सदरचा विषय तहकुब ठेवणेत यावा असे ही सुचित करीत आहे.

सूचक :- Keerzon

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- बी.एच.जाधव

महापौर,

कार्य-अभियंता (पा.पु.)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १०

दिनांक :- २०/०१/२०१२

ठराव क्रमांक :- 206

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (प्र.स.क्र.०१) यांचे दि.१९/०१/२०१२ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेच कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

केंद्र शासनाच्या नागरी विकास मंत्रालयाने राष्ट्रीय शहर स्वच्छता धोरण जाहिर केले आहे. त्यामध्ये राज्य पातळीवरील स्वच्छता योजना व शहर स्वच्छता योजना यांचा आकृतीबंध यामध्ये नमुद केलेल्या महाराष्ट्र राज्यातील १९ महानगरपालिकेचा (सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसह) शहर स्वच्छता आराखडा तयार करणेसाठी यांची क्षमता बांधणी करणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील काम सोपविले असलेचे पत्र क्र.शस्वआ-२०१०/प्र.क्र. ४९/पापु-२१ दि.१३/०४/२०१० अन्वये महापालिकेस कळविले आहे.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सुचना व मार्गदर्शनानुसार शहर स्वच्छता आराखड्याच्या कामामध्ये महापालिकेचे पाणी पुरवठा व जलनि:सारण विभाग, बांधकाम विभाग आणि आरोग्य विभागाचा सहभाग असल्याने या सर्व विभागांची संयुक्तीक कार्यशाळा आयोजित करणेत आली. तसेच, मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली कार्यबल गट समिती स्थापन करणेत आली. तसेच, शहर स्वच्छता आराखडा अंमलबजाबणी सोशल मॅपींग कार्यशाळा घेवून गलीच्छ वसाहतीमध्ये स्वयंसेविकांना सोशल मॅपिंगचे प्रशिक्षण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तज्ञ प्रतिनिधीनी दिले.

शहर स्वच्छता आराखड्या संबंधी महापालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांच्या माहिती संकलनाची प्रपत्रे वाढनिहाय,प्रभाग निहाय व संपुर्ण महापालिका क्षेत्र याबाबत तयार करुन ती अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडे पाठविण्यात आली आणि सर्व्हीस लेव्हल बेंचमार्क अंतर्गत पाणी पुरवठा सेवा,मलनि:सारण सेवा,घनकचरा व्यवस्थापन,शौचालय व्यवस्थापन व पावसाळी पाण्याचा निचरा याबाबतची माहिती तयार करुन महाराष्ट्र शासन व अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडे पाठविण्यात आली.

शहर स्वच्छता आराखडा महापालिका क्षेत्राच्या विकासावर दुरगामी परिणाम करणारी महत्वाची योजना असल्याने याबाबतचा आराखडा तयार करणेसाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.५८ दि.०३/०५/२०११ अन्वये मे.निखिल ॲनॉलिटीकल ॲण्ड लेबोरेटरी,सांगली या तज्ञ सल्लागार एजन्सीची नियुक्ती करणेत आली. त्यांनी महापालिकेने दिलेल्या सर्वांगिन माहितीचा समावेश करुन मनपा क्षेत्राचा शहर स्वच्छता आराखडा तयार केला. त्यास मा.महासभा ठराव क्र.८५ दि.२०/०७/२०११ अन्वये मान्यता देण्यात आली.

मा.महासभेच्या मान्यतेने सदरचा शहर स्वच्छता आराखडा मा.शासनाकडे सादर करणेत आला. याकामी मा.प्रधान सचिव, नगरविकास यांच्या अध्यक्षतेखाली स्टेअर्रींग कमिटीची दि.२२/११/२०११ रोजी मंत्रालय मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीस मनपाचे मा.आयुक्तसाो व वैद्यकिय आरोग्याधिकारी उपस्थित होते. स्टेअर्रींग कमिटीच्या झालेल्या चर्चेनुसार आराखड्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असून, शौचालय,मलनि:सारणं,घनकचरा व्यवस्थापन,पाणी पुरवठा व्यवस्थापन, पावसाळी पाण्याचा निचरा व्यवस्था,पर्यावरण व्यवस्था, माहिती शिक्षण सुसंवाद व सोशल मॅपिंग आर्थिक निधी उपलब्धता याबाबतचा डाटा मुद्देनिहाय समाविष्ठ करणेविषयी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने सुचित केलेनुसार मनपाचे तज्ञ सल्लागार मे.निखिल ॲनॉलिटीकल ॲण्ड लेबोरेटरी,सांगली यांना जरुर त्या सुचना व माहिती देवून त्यांचेकडून सुधारीत शहर स्वच्छता आराखडा R२ तयार करणेत आला. त्यामध्ये सद्यस्थितीतील माहिती समाविष्ठ करणेत आली आहे. त्यानुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासनाच्या स्टेअर्रींग कमिटीच्या सुचना व मार्गदर्शन विचारात घेवून तयार करणेत आलेल्या महापालिकेच्या सुधारीत शहर स्वच्छता आराखड्यास ड्राफ्ट R२ ला विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :- २०/०१/२०१२

ठराव क्रमांक :- २०८

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१२/०१/२०१२ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेच कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशा) सांगली यांचेकडील प्र.क्र.बिउआ/व्हॅट/प्रशा/आस्था/का आ/ब/११२८८ दि.३०/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये जिल्हापरिषदेसमोर मनपा मालकीच्या इमारती मधील ३१०० चौ.फुट जागा भोडे तत्वावर मिळणेची मागणी केली आहे. जिल्हा परिषदेसमोर एकात्मिक शहर विकास योजनेंतर्गत शॉपिंग सेंटर इमारत बांधण्यात आली असून, या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर ३०२.२५ चौ.मी. बांधकाम (हॉल,कॉन्फरन्स् हॉल, टॉयलेट इ.) जागा रिकामी आहे.

तरी सांगली जिल्हा परिषदेसमोरील मंगलधाम शॉपिंग सेंटर मधील पहिल्या मजल्यावरील रिक्त असलेली ३०२.२५ चौ.मी.जागा विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशा) सांगली यांना भाडे तत्वावर देणेस व सदर जागेचे भाडे शासनाच्या सार्व.बांधकाम विभाग मिरज यांचेकडून निश्चित करुन घेणेस प्रस्ताव पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :-२०/०१/२०११

ठराव क्रमांक :- २०९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या मिरज हायस्कूल पटांगण कोणत्याही कार्यक्रमास देवू नये असे यापूर्वी महासभेने धोरण ठरविले आहे. त्यामध्ये बदल करुन सदरचे पटांगण धार्मिक कार्यक्रमास तसेच, आर्थिक व्यवहार नसलेल्या कार्यक्रमांना भाडेतत्वावर नाममात्र रु.१०००/- मात्रचे भाडे आकारुन देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच, पटांगण कार्यक्रमास देणे पूर्वी मुख्याध्यापक,मिरज हायस्कूल यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करणेत येत असून, कार्यक्रमासाठी घेण्यात येणारे भाडे मुख्याध्यापक,मिरज हायस्कूल यांनी भरुन घ्यावे असे ही सभा सूचीत करीत आहे.

सूचक :- Keerron

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [illegible]

महापौर,

1) मालमत्ता व्यवस्थापक
2) मुख्याध्यापक मिरज हायस्कूल.
सदरचा ठराव मा. आयुक्तसो यांचे निर्देशनास आणून कार्यवाही केला.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.